# <u>प्रधानमंत्री आवास योजना –PMAY</u>

प्रधान मंत्री आवास योजना ही मा.पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची एक महत्वाकांक्षी योजना आहे.१ जून २०१४ रोजी संसदेच्या दोन्ही सभागृहांच्या एकत्रीत सभेत उद्देशून केलेल्या भाषणात याची घोषणा मा.मोदींनी केली. सन २०२२ साली स्वतंत्र भारताच्या निर्मीतीला जेव्हा ७५ वर्षे पूर्ण होतील तेव्हा प्रत्येक भारतीय कुटुंबाकडे स्वत:चे पक्के घर असेल यासाठी ही योजना मा.नरेंद्र मोदींनी आणली आहे.

या योजनेचे चार मुख्य भाग आहेत. प्रामुख्याने आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक व कमी उत्पन्न गटातील कुटुंबासाठी ही योजना योजली आहे.२०१७ मध्ये या योजनेचा लाभ मध्यम वर्गीय कुटुंबामधील नागरीकांसाठी देखील देण्यात आला आहे. विवीध कुटुंबांच्या गरजांप्रमाणे नियोजीत केलेले या योजनेचे चार भाग पुढील प्रमाणे

१) **जागेवरच झोपडपट्टीचा पुनर्विकास (In city slum Redevelopment) -** झोपडपट्टीमधे
रहाणा-या लोकांचे त्याच ठिकाणी नवीन घरे बांधून केलेले पुनर्वसन. यामध्ये जागा हे भांडवल वापरून खाजगी विकसकांच्या माध्यमातून नवीन पक्की घरे बांधण्याचे नियोजन केले आहे.

२) **कर्जाशी निगडीत आर्थिक मदत ( Credit Linked Subsidy scheme )** या योजनेत ज्या
कुटुंबाला आर्थिक अडचणीमुळे घर घेणे शक्य होत नाही त्या कुटुंबांना आर्थिक सहाय्य देउन घर घेण्यास प्रोत्साहीत करण्याचा उद्देश आहे. पूर्वी आर्थिक दुर्बल व कमी उत्पन्न वर्गातील कुटुंबांसाठी लागू असणारी ही योजना आता म्ध्यम वर्गीय कुटुंबांना देखील लागू करण्यात आली आहे.या योजनेत देण्यात आलेल्या निकषांप्रमाणे घर घेतल्यास घर घेण्यासाठी काढलेल्या गृह कर्जाच्या खात्यात केंद्रसरकार डायरेक्ट सबसीडीची रक्कम जमा करते.साधारणत: आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील कुटुंबांना रू.२,७२,०००/-व मध्यम वर्गीय गट -१ व मध्यम वर्गीय गट -२ मधे मोडणा-या कुटुंबांना रू.२,३०,०००/- पर्यंत प्रत्यक्ष आर्थिक मदत दिली जाते. मध्यमवर्गीयांसाठी ही योजना फक्त २०१७ कॅलेंडर वर्षा पुरतीच मर्यादीत आहे.

३) <u>परवडणा-या घरांची निर्मीती</u>- **(Affordable Housing )** स्थानीक स्वराज्य सस्थांच्या ताब्यातील आर्थिक दुर्बल घटकांसाठी आरक्षीत जागांवर खाजगी /सरकारी क्षेत्रातील गृहविकसकांबरोबर भागीदारी करून नवीन घरांची निर्मीती करणे व गरजू लोकांना ती विकणे.कोणत्याही गृहप्रकल्पात एकूण घरांच्या ३५% पेक्षा जास्त घरे आरक्षीत असल्यास केंद्रसरकार त्या गृहप्रकल्पातील प्रत्येक घराला अर्थ सहाय्य देखील देईल .

४) व्यक्तीगत घर बांधणीसाठी अर्थ सहाय्य - (**Subsidy for beneficiary led Individual House Construction)-**

आर्थिक दुर्बल घटकातील कुटुंबांना स्वतंत्र घराची आवश्यकता असल्यास अशा व्यक्तींच्या साठी राज्यसरकारने स्वतंत्र वस्ती बांधावयास काढली तर त्यासाठी अर्थ सहाय्य केंद्रसरकार कडून मिळेल.

वरील प्रमाणे सवलती /आर्थिक मदत केंद्रसरकारद्धारे प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत उपलब्ध आहे. गरजू व्यक्तींनी याचा अवश्य लाभ घ्यावा. या बाबत काही मार्गदर्शन हवे असल्यास संपर्क करावा.

**-:संपर्क;-**

**श्री .विनायक आंबेकर(मो,९८२२०४४५२०)**

**अध्यक्ष- पं.दीनदयाळ  विकास वाहीनी**